श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## UG- 11.24 पंचम सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्रीकृष्ण तैयार ।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**एकादशः स्कन्धः**

**॥ अथ चतुर्विं(म्)शोऽध्यायः ॥**

**श्रीभगवानुवाच**
**अथ ते सं(म्)प्रवक्ष्यामि, सां(ङ्)ख्यं(म्) पूर्वैर्विनिश्चितम् ।**
**यद् विज्ञाय पुमान् सद्यो, जह्याद् वैकल्पिकं(म्) भ्रमम् ॥ 1॥**

श्रीभगवान म्हणतात – प्राचीन काळच्या ऋषींनी ज्याचा निश्चय केला आहे, ते सांख्यशास्त्र मी तुला सांगतो. हे जाणले असता मनुष्य काल्पनिक भेदरूप भ्रम ताबडतोब सोडून देतो. (१)

आसीज्ज्ञानमथो ह्यर्थ, एकमेवाविकल्पितम् ।
यदा विवेकनिपुणा, आदौ कृतयुगेऽयुगे ॥ 2॥

अगदी सुरुवातीला जेव्हा प्रलयकाल होता, तेव्हा ज्ञान आणि ज्ञेय हे सर्व मिळून एकच तत्त्व होते. नंतर जेव्हा कृतयुग आले, तेव्हाही विवेकी लोकांच्या दृष्टीने एकच आत्मतत्त्व होते. (२)

तन्मायाफलरूपेण, केवलं(न्) निर्विकल्पितम् ।
वाङ्मनोगोचरं(म्) सत्यं(न्), द्विधा समभवद् बृहत्॥ 3॥

कोणत्याही प्रकारचा भेद नसलेले ते सत्य ब्रह्म होते, मन किंवा वाणी यांना ते कळत नव्हते. माया आणि तीत प्रतिबिंबित झालेल्या जीवाच्या रूपाने दृश्य आणि द्रष्टा या दोन भागात ते विभागले गेले. (३)

तयोरेकतरो ह्यर्थः(फ्), प्रकृतिः(स्) सोभयात्मिका ।
ज्ञानं(न्) त्वन्यतमो भावः(फ्), पुरुषः(स्) सोऽभिधीयते ॥ 4॥

त्यांपैकी एका वस्तूला प्रकृती म्हणतात. तिनेच जगामध्ये कार्य आणि कारण अशी दोन रूपे धारण केली. दुसरी वस्तू म्हणजे ज्ञानस्वरूप जीवात्मा. त्याला पुरुष म्हणतात. (४)

तमो रजः(स्) सत्त्वमिति, प्रकृतेरभवन् गुणाः ।
मया प्रक्षोभ्यमाणायाः(फ्), पुरुषानुमतेन च ॥ 5॥

जीवांच्या शुभ-अशुभ कर्मानुसार मीच प्रकृतीला प्रबुद्ध केले. तेव्हा तिच्यापासून सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण प्रकट झाले. (५)

तेभ्यः(स्) समभवत् सूत्रं(म्), महान् सूत्रेण सं(यँ)युतः।
ततो विकुर्वतो जातोऽ- हं(ङ्)कारो यो विमोहनः ॥ 6॥

त्यांच्यापासून क्रियाशक्तिप्रधान सूत्र आणि ज्ञानशक्तिप्रधान महत्तत्त्व हे प्रकट झाले. हे दोघे एकमेकांत मिसळलेलेच आहेत. महत्तत्त्वापासून अहंकार उत्पन्न झाला. हा अहंकारच जीवांना मोह उत्पन्न करतो. (६)

वैकारिकस्तैजसश्च, तामसश्चेत्यहं(न्) त्रिवृत् ।
तन्मात्रेन्द्रियमनसां(ङ्), कारणं(ञ्) चिदचिन्मयः ॥ 7॥

तो अहंकार सात्त्विक, राजस आणि तामस असा तीन प्रकारचा आहे. पंचतन्मात्रा, इंद्रिये आणि मन ही अहंकाराची कार्ये आहेत. म्हणून तो जड-चेतन असा उभयात्मक आहे. (७)

अर्थस्तन्मात्रिकाज्जज्ञे, तामसादिन्द्रियाणि च ।
तैजसाद् देवता आसन्- नेकादश च वैकृतात् ॥ 8॥

तामस अहंकारापासून पंचतन्मात्रा आणि त्यांपासून पंचमहाभूते उत्पन्न झाली. राजस अहंकारापासून इंद्रिये आणि सात्त्विक अहंकारापासून इंद्रियांच्या अधिष्ठात्या अकरा देवता प्रकट झाल्या. (८)

मया सं(ञ्)चोदिता भावाः(स्), सर्वे सं(म्)हत्यकारिणः।
अण्डमुत्पादयामासुर्- ममायतनमुत्तमम् ॥ 9॥

माझ्या प्रेरणेने हे सर्व पदार्थ एकत्र होऊन एकमेकांत मिसळले गेले आणि त्यांनी ब्रह्मांडरूप अंडे उत्पन्न केले. हे ब्रह्मांड माझे उत्तम निवासस्थान आहे. (९)

तस्मिन्नहं(म्) समभव- मण्डे सलिलसं(म्)स्थितौ ।
मम नाभ्यामभूत्पद्मं(वँ), विश्वाख्यं(न्) तत्र चात्मभूः ॥ 10॥

जेव्हा ते अंडे पाण्यामध्ये स्थिर झाले, तेव्हा मीच नारायणरूपाने त्यात विराजमान झालो. माझ्या नाभीपासून विश्वकमळाची उत्पत्ती झाली. त्यावर ब्रह्मदेव प्रकट झाला. (१०)

सोऽसृजत्तपसा युक्तो, रजसा मदनुग्रहात् ।
लोकान् सपालान् विश्वात्मा, भूर्भुवः(स्) स्वरिति त्रिधा ॥ 11॥

विश्वस्वरूप ब्रह्मदेवाने तपश्चर्या केली आणि माझ्या कृपेने रजोगुणाच्या द्वारे पृथ्वी, अंतरिक्ष आणि स्वर्ग या तीन लोकांची व त्यांच्या लोकपालांची निर्मिती केली. (११)।

देवानामोक आसीत् स्वर्- भूतानां(ञ्) च भुवः(फ्) पदम् ।
मर्त्यादीनां(ञ्) च भूर्लोकः(स्), सि*द्धानां(न्) त्रितयात् परम् ॥ 12॥

देवतांचे निवासस्थान स्वर्ग, भूत-प्रेतांचे अंतरिक्ष आणि मनुष्य इत्यादींसाठी पृथ्वी हे स्थान ठरविले. या तीन लोकांच्या वरच्या बाजूला महर्लोक इत्यादी सिद्धांची निवासस्थाने ठरविली. (१२)

अधोऽसुराणां(न्) नागानां(म्), भूमेरोकोऽसृजत् प्रभुः।
त्रिलोक्यां(ङ्) गतयः(स्) सर्वाः(ख्), कर्मणां(न्) त्रिगुणात्मनाम् ॥ 13॥

ब्रह्मदेवाने असुर आणि नागांसाठी पृथ्वीच्या खाली लोक तयार केले. या तिन्ही लोकांमध्ये त्रिगुणात्मक कर्मांना अनुसरून जीवांना निरनिराळ्या गती प्राप्त होतात. (१३)

योग*स्य तपस*श्चैव*, न्यास*स्य गतयोऽमलाः ।
महर्जन*स्तपः(स्) स*त्यं(म्), भ*क्तियोग*स्य म*द्गतिः ॥ 14॥

योग, तपश्चर्या आणि संन्यास यांच्याद्वारे महर्लोक, जनलोक, तपोलोक व सत्यलोकस्वरूप उत्तम गती प्राप्त होते आणि भक्तियोगाने माझे परम धाम प्राप्त होते. (१४)

मया कालात्मना धात्रा, कर्मयु*क्तमिदं(ञ्) जगत् ।
गुण*प्रवाह एत*स्मिन्-नु*न्मज्जति निमज्जति ॥ 15॥

हे कर्मबद्ध जग कर्मफळ देणाऱ्या काळरूप माझ्यामुळे या गुणप्रवाहात कधी वर तर कधी अधोगतीत जाते. (१५)

अणुर्बृहत् कृशः(स्) स्थूलो, यो यो भावः(फ्) प्रसि*ध्यति ।
सर्वोऽप्युभयसं(यँ)यु*क्तः, प्रकृ*त्या पुरुषेण च ॥ 16॥

लहान-मोठे, कुश-स्थूल असे जे जे पदार्थ उत्पन्न होतात, ते सर्व प्रकृती आणि पुरुष या दोघांच्या संयोगानेच.

यस्तु यस्यादिरन्तश्च, स वै मध्यं(ञ्) च तस्य सन् ।
विकारो व्यवहारार्थो, यथा तैजसपार्थिवाः ॥ 17॥
यदुपादाय पूर्वस्तु, भावो विकुरुतेऽपरम् ।
आदिरन्तो यदा यस्य, तत् सत्यमभिधीयते ॥ 18॥

ज्याच्या सुरुवातीला आणि शेवटी जे असते, तेच मध्ये असते आणि तेच सत्य आहे. कार्य ही फक्त व्यवहारासाठी केलेली कल्पना आहे. जशी बांबड्या-कुंडले इत्यादी सोन्याची कार्ये किंवा घडा-गाडो इत्यादी मातीची कार्ये. पहिला कारण पदार्थ ज्या परम कारणाच्या आधाराने पुढील कार्यपदार्थाला उत्पन्न करतो, तेच परमकारण केवळ सत्य असते. कारण तेच कार्याच्या आधी आणि शेवटीही असते. (जसा भिजलेला मातीचा गोळा घड्याचे कारण असतो. पण तो मूळ माती या परमकारणाच्या आधारानेच घडारूप कार्याचे कारण बनतो. भिजलेल्या गोळ्याच्या आधी माती गोळ्यात माती, घड्यात माती आणि घडा फुटल्यावरही मातीच असते. म्हणून मातीच सत्य होय.) (१७-१८)

प्रकृतिर्ह्यस्योपादान- माधारः(फ्) पुरुषः(फ्) परः ।
सतोऽभिव्यञ्जकः(ख्) कालो, ब्रह्म तत्त्रितयं(न्) त्वहम् ॥ 19॥

या प्रपंचाचे उपादान कारण प्रकृती आहे, आधार परमात्मा आहे आणि यांना प्रकट करणारा काळ आहे. प्रकृती, परमपुरुष आणि काळ ही तिन्ही रूपे खरे पाहता ब्रह्मस्वरूपच आहेत आणि तेच शुद्ध ब्रह्म मी आहे. (१९)

सर्गः(फ्) प्रवर्तते तावत्- पौर्वापर्येण नित्यशः ।
महान् गुणविसर्गार्थः(स्), स्थित्यन्तो यावदीक्षणम् ॥ 20॥

जोपर्यंत परमात्म्याची ईक्षणशक्ती आपले काम करीत राहते, तोपर्यंत जीवांच्या कर्मभोगासाठी कारण-कार्यरूप हे विविध सृष्टिचक्र अखंड चालू राहते. (२०)

विराण्मयाऽऽसाद्यमानो, लोककल्पविकल्पकः।
पं(ञ्)चत्वाय विशेषाय, कल्पते भुवनैः(स्) सह ॥ 21॥

मी काल्पनिकपणे हे ब्रह्मांड व्यापलेले असते, त्यामध्ये विविध लोकांची उत्पत्ती व संहार होत असतात. जेव्हा मी प्रलय करण्याचा संकल्प करतो, तेव्हा ब्रह्मांड पुन्हा असीम विशाल होऊन जाते. (२१)

अन्ने प्रलीयते मर्त्य- मन्नं(न्) धानासु लीयते ।
धाना भूमौ प्रलीयन्ते, भूमिर्गन्धे प्रलीयते ॥ 22॥

विनाशाच्या वेळी प्राण्यांचे शरीर अन्नामध्ये, अन्न बीजामध्ये, बीज भूमीमध्ये आणि भूमी गंधतन्मात्रेमध्ये लीन होऊन जाते. (२२)

अप्सु प्रलीयते गन्ध, आपश्च स्वगुणे रसे ।
लीयते ज्योतिषि रसो, ज्योती रूपे प्रलीयते ॥ 23॥

गंध पाण्यामध्ये, पाणी आपला गुण जो रस त्यामध्ये, रस तेजामध्ये आणि तेज रूपामध्ये लीन होऊन जाते. (२३)

रूप(वँ्) वायौ स च स्पर्शे, लीयते सोऽपि चाम्बरे ।
अम्बरं(म्) शब्दतन्मात्र, इन्द्रियाणि स्वयोनिषु ॥ 24॥

रूप वायूमध्ये, वायू स्पर्शामध्ये, स्पर्श आकाशामध्ये आणि आकाश शब्दतन्मात्रेमध्ये लीन होऊन जाते. इंद्रिये आपल्या अधिष्ठात्या देवतांमध्ये आणि शेवटी राजस अहंकारामध्ये समाविष्ट होऊन जातात. (२४)

योनिर्वैकारिके सौम्य, लीयते मनसीश्वरे ।
शब्दो भूतादिमप्येति, भूतादिर्महति प्रभुः ॥ 25॥

हे सौम्य! राजस अहंकार आपला नियंता असलेल्या सात्त्विक अहंकाररूप मनामध्ये, शब्दतन्मात्रा महाभूतांचे कारण असलेल्या तामस अहंकारामध्ये आणि सर्व ज्ञानेन्द्रिये मोहित करण्यास समर्थ असलेला त्रिविध अहंकार, महत्तत्त्वामध्ये लीन होऊन जातो. (२५)

स लीयते महान् स्वेषु, गुणेसु गुणवत्तमः ।
तेऽव्यक्ते सं(म्)प्रलीयन्ते, तत् काले लीयतेऽव्यये ॥ 26॥

ते महत्त्व आपल्याला कारण असलेल्या त्रिगुणांमध्ये लीन होऊन जाते. गुण प्रकृतीमध्ये आणि प्रकृती अविनाशी कालामध्ये लीन होऊन जाते. (२६)।

कालो मायामये जीवे, जीव आत्मनि मय्यजे ।
आत्मा केवल आत्मस्थो, विकल्पापायलक्षणः ॥ 27॥

काल मायामय जीवामध्ये आणि जीव मायेमध्ये-अन्नामध्ये परमात्म्यामध्ये लीन होऊन जातो. आत्मा मात्र आपल्या स्वरूपातच स्थित राहतो. तो द्वैताची उत्पत्ती आणि लय यांच्या अधिष्ठानामुळे जाणला जातो. (२७)

एवमन्वीक्षमाणस्य, कथं(वँ) वैकल्पिको भ्रमः ।
मनसो हृदि तिष्ठेत, व्योम्नीवार्कोदये तमः ॥ 28॥

अशा प्रकारे विवेकदृष्टीने जो पाहतो, त्याच्या विचारामध्ये भेदविषयक भ्रम कसा निर्माण होईल आणि झालाच तरी हृदयात कसा टिकू शकेल? सूर्योदयानंतर आकाशात अंधकार राहू शकेल काय? (२८)

एष सां(ङ्)ख्याविधिः(फ्) प्रोक्तः(स्), सं(म्)शयग्रन्थिभेदनः।
प्रतिलोमानुलोमाभ्यां(म्), परावरदृशा मया ॥ 29॥

कार्य आणि कारण या दोघांनाही साक्षी असणाऱ्या मी सृष्टीची उत्पत्ती ते प्रलय आणि प्रलयापासून उत्पत्तीपर्यंतचे सांख्यशास्त्र तुला सांगितले. यामुळे आत्मस्वरूपाविषयीचा संशय नाहीसा होतो. (२९)

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)
सं(म्)हितामेकादशस्कन्धे चतुर्विं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥